**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पूर्व),**
**ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.**

प्रगतीचा प्रकाश हाव बहुजन विकास
वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

**दूरध्वनी** : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
**फॅक्स** : ०२५० - २५२५१०७
**ई-मेल** : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र.** : व.वि.श.म./वैआवि/६४२/२०२१
**दिनांक** : ०१/०६/२०२१

विषय- कोव्हिड-१९ लसीकरणासंदर्भातील सुधारीत मार्गदर्शक सुचनेतील बदलाबाबत.
संदर्भ- एमजीसी/एफ/४५२५ दि.२०-०५-२०२१

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ या आजाराकरिता प्रतिबंधात्मक लसीकरण राबविण्यात येत असुन या लसीकरण मोहिमेत ६० वर्षे व अधिक वयोगटातील अंदाजित ४७,१७७ (२३.६%) एवढया लाभार्थ्यांना कोव्हिड-१९ लसीची पहिली मात्रा देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त संदर्भिय परिपत्रकानुसार,६० वर्षे व अधिक वयोगटातील नागरीकांसाठी पहिल्या मात्रेकरिता थेट लसीकरण केंद्रात जाऊन लस घेण्याकरीता सुविधा उपलब्ध केलेली होती. सदर सुविधेच्या अनुषंगाने प्रतिदिन सरासरी केवळ १००० लाभार्थी लाभ घेत होते. परंतु ४५ वर्षे व अधिक वयोगटातील ६ लाख नागरीकांपैकी पहिल्या मात्रेकरिता साधारण ४३,४३२ (७.२%) एवढया लाभार्थ्यांना कोव्हिड-१९ लसीची पहिली मात्रा देण्यात आलेली आहे. तसेच ६० वर्षे व अधिक वयोगटातील नागरीकांचा अल्प प्रतिसाद लक्षात घेता ४५ वर्षे व अधिक वयोगटातील नागरीकांना पहिल्या मात्रेचा लाभ उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. जेणेकरुन उपलब्ध लससाठा व मनुष्यबळ तसेच साधनसामुग्री यांचा पुरेपुर वापर होईल. त्या अनुषंगाने परिपत्रकातील सुधारित सुचना खालीलप्रमाणे असतील.

सोमवार ते शनिवार या दिवशी खालील गटातील लाभार्थ्यांना त्यांच्या राहत्या प्रभागाच्या नजीकच्या लसीकरण केंद्रावर थेट (onspot-walk in & online) लसीकरणाची सुविधा उपलब्ध राहील.

१) ४५ वर्षे व अधिक वयोगटातील नागरीक कोव्हिशिल्ड लसीच्या पहिल्या व दुसऱ्या डोसचे लाभार्थी.
२) आरोग्य कर्मचारी व आघाडीवर काम करणारे इतर कर्मचारी वर्गातील कोव्हिशिल्ड लसीचे पहिल्या व दुसऱ्या डोसचे लाभार्थी.
३) कोवॅक्सीन लसीच्या दुसऱ्या डोसचे लाभार्थी
४) स्तनदा माता (प्रसुतिनंतर १ वर्षापर्यंत -बाळाचा जन्मदाखला अनिवार्य)
५) वसई विरार कार्यक्षेत्रातील रहिवासी असलेल्या १८ ते ४४ वर्षे वयोगटातील उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक वैध पुराव्यानिशी म्हणजेच परदेशी विद्यापीठ प्रवेश मिळाल्याचे निश्चितीपत्र, परदेशी व्हिसा, व्हिसा मिळण्यासाठी संबंधित विद्यापीठाकडून प्राप्त झालेले I-20 or DS-160 Form इत्यादी असल्यास (Admission confirmation letter and I-20 or DS-160 Form for Foreign Visa from concerned overseas University etc) लसीकरण केंद्रावर थेट जाऊन लसीचा लाभ घेता येईल.

सोमवार ते शनिवार या दिवशी प्रत्येक लसीकरण केंद्रावर १००% लसीकरण हे कोविन ॲपवर नोंदणी तसेच लसीकरण केंद्र व वेळ निश्चित झाल्यानंतरच केले जाईल.

| अ.क्र. | प्रभाग समिती | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती ए | बोळींज | विरार गार्डनच्या बाजूला, बोळिंज, विरार (प.) |
| २ | प्रभाग समिती बी | मोरेगाव | मोरेगाव तलावाजवळ, नालासोपारा (पूर्व) |
| ३ | प्रभाग समिती सी | नारिंगी | बायपास रोड, रेन्बो हॉटेल समोर, नारिंगी, विरार (पूर्व) |
| ४ | प्रभाग समिती डी | आचोळे | आचोळे तलावाजवळ, आचोळे, नालासोपारा (पूर्व) |
| ५ | प्रभाग समिती ई | पाटणकर पार्क | पाण्याच्या टाकीजवळ, पाटणकरपार्क, नालासोपारा(प.) |
| ६ | प्रभाग समिती एफ | पेल्हार | पेल्हार, तलाठी ऑफीस जवळ, नालासोपारा (पूर्व) |
| ७ | प्रभाग समिती जी | वालीव | ग्रामपंचायत इमारत, वालीव नाका, वालीव वसई (पूर्व) |
| ८ | प्रभाग समिती एच | दिवाणमान | दिवाणमान तलावाजवळ,दिवाणमान, वसई (प.) |
| ९ | प्रभाग समिती आय | वसई गाव | पारनाका, वसई तहसील रोड, वसई (प.) |

आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका